**प्रेसनोट** दिनांक –२५/०१/२०२४

**" तलासरी आरटीओ चेकपोस्ट येथील तपासणी नाक्यावरील खाजगी इसम यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी लाच स्विकारताना ताब्यात घेतले बाबत".**

| | | |
|---|---|---|
| १ | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | तलासरी पोलीस ठाणे, जिल्हा पालघर गु.र.नं. ११/२०२४ |
| ३ | **कलम** | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ अ प्रमाणे |
| ४ | **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | **आरोपीत जयदास महादेव वायंगणकर, वय ५५ वर्षे, तलासरी आरटीओ चेकपोस्ट येथील तपासणी नाक्यावरील खाजगी इसम** |
| ५ | **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ६००/–रूपये. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ६००/– रुपये |
| ७ | **थोडक्यात हकिगत** | यातील तक्रारदार हे व्यवसायाने ड्रायव्हर असून ते मिळालेल्या ऑर्डरप्रमाणे त्यांचे मालकाचे ट्रकमध्ये माल भरून मुंबई ते सुरत अशी मालाची ने–आण करत असतात. सुमारे दहा दिवसापुर्वी तलासरी आरटीओ चेकपोस्ट येथील तपासणी नाक्यावर असणारे साध्या वेशातील कर्मचारी हे ट्रक पास करून पुढे जावू देण्यासाठी एन्ट्री म्हणून ३००/–रू.ची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सदरचे पैसे कशासाठी व कोणासाठी असे विचारले असता त्यांनी सदरचे पैसे हे तेथील आरटीओ साहेबांना दयावे लागतात असे सांगून तक्रारदार यांचेकडून ३००/–रूपये लागलीच स्विकारले. तसेच परत येतानाच्या एन्ट्रीचे प्रत्येक गाडीचे ३००/– रू. घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक २४/०१/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयाकडे सदर बाबत मालकांशी विचार विनिमय करून तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.२५/०१/२०२४ रोजी पंचासमक्ष तलासरी आरटीओ चेकपोस्ट येथे तक्रारदार यांना पाठवून लाचेच्या रक्कमेची मागणीची पडताळणी केली असता, यातील आरोपीत खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्या मालकांचे दोन ट्रकची वजन काटा पावतीची रक्कम भरलेली असताना सुदधा सदरचे चेकपोस्टवरून पुढे गुजरात बाजुकडे जावू देण्यासाठी एका ट्रकचे ३०० प्रमाणे दोन्ही ट्रकचे ६००/–रू. लाचेची मागणी करून ती लागलीच तलासरी चेकपोस्ट येथील परिवहन कार्यालयाच्या इमारतीमध्ये येथे पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारली असता खाजगी इसम जयदास वायंगणकर यांना दिनांक २५/०१/२०२४ रोजी १०:५० वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– —

अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :– 1064

दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297

व्हॉट्स अॅप क्र. :– 9423884745, 9404218543


(शिरीष चौधरी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

Scanned with CamScanner